निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २०४ वा.
शनिवार - २७ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247



## गुंड निलेश घायवळ लंडनला

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी**/शहरात १० दिवसांपूर्वी झालेल्या कोथरूड गोळीबार प्रकरणात गुंड निलेश घायवळ याच्यासह १० जणांवर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारीविरोधी कायद्यानुसार (मकोका) कारवाई केली आहे. पोलीस ठाण्यापासून शंभर ते दोनशे मीटर अंतरावर एका तरुणावर केलेल्या गोळीबाराच्या गुन्ह्यामध्ये ही कारवाई करण्यात आली आहे. या घटनेनंतर मुख्य आरोपी असलेला निलेश घायवळ लंडनला पळून गेल्याची माहिती पोलिस तपासातून समोर आली असून पोलिसांनी त्याच्या कोथरुड येथील घरावर धाड टाकली. या धाडीत त्याच्या घरातून २ स्कॉर्पिओ आणि २ दुचाकी गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत. निलेश घायवळ लंडनला पळून गेल्याचं पोलिस तपासातून समोर आलं असून त्याने पासपोर्ट आपल्याकडे जमाच केला नाही, असं पोलिसांनी म्हटलं. तसेच, त्याच्याबाबत लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली असून भारतात परत येताच त्याला अटक करण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केलं. निलेश घायवळने गुन्हेगारी कृत्यामधुन खूप मोठ्या प्रमाणात पैसा कमावला असून त्यातूनच त्याने लंडनमध्ये घर घेतलं आहे. निलेशचा मुलगाही लंडनमध्ये हायफाय ठिकाणी शिक्षण घेत असल्याचं पोलिसांनी सांगितलं. त्यामुळेच, पोलिसांनी आता त्याच्या कोथरुड येथील घरातून कारवाईला सुरुवात केली आहे.

**पोलिसांनी कोथरूडचा घर गाठलं; २ स्कॉर्पिओ अन् टू-व्हिलर जप्त, आरोपींची धिंडही काढली**

## मी आंदोलनात असेन किंवा नसेनही, लक्ष्मण हाकेंची भावनिक पोस्ट

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी**/राज्यात गेल्या काही महिन्यांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला असून दोन्ही समाज बांधव आरक्षणाच्या लढाईसाठी आंदोलनाचं मैदान गाजवत आहेत. एकीकडे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावं म्हणून लढा देत आहेत, तर ओबीसी आरक्षणात मराठ्यांचा सहभाग नसावा म्हणून लक्ष्मण हाकेंसह अनेक ओबीसी नेते पुढे सरसावले आहेत. त्यामध्ये, लक्ष्मण हाके हे आक्रमकपणे भूमिका मांडत असून थेट पवार कुटुंबावर शाब्दिक हल्ला करत आहेत. तसेच, मनोज जरांगे पाटील यांच्यावरही ते जोरकसपणे टीका करत असल्याचे दिसते. त्यातून, त्यांना फोनद्वारे धमक्याही दिल्या जात आहेत. तर, दुसरीकडे ओबीसी नेत्यांकडूनकडूनही त्यांना डावललं जात असल्याची चर्चा आहे. त्याच, पार्श्वभूमीवर आता लक्ष्मण हाकेंनी केलेली फेसबुक पोस्टही चांगलीच चर्चेत आहे. त्यावरुन, लक्ष्मण हाके आंदोलन पुढे नेणार की सोडणार, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.





लक्ष्मण हाके यांनी आपल्या फेसबुक पोस्टमध्ये म्हटलं की, मी प्रामाणिकपणे भांडतोय, ओबीसी भटके एकत्र आले पाहिजेत म्हणून, आपले हक्क अधिकार टिकले पाहिजेत म्हणून. मी एक मेंढपाळ धनगराचं पोरगं आहे, मी बॅनर छापू शकत नाही, गाडी ला पैसे देऊ शकत नाही, भले मोठे स्टेज लावू शकत नाही, कुणाला चहा पाजू शकत नाही, हे माहित असूनही तुम्ही आजपर्यंत मला साथ दिली. उपोषण आंदोलन असो की मोर्चे, एल्गार मेळावे असोत किंवा रॅली, तुम्ही ताकदीने माझ्या पाठीशी उभे राहिलात. मला पाठिंबा देत राहिलात, मी तुमचे आभार मानावेत तेवढे कमी आहेत. मी ओबीसीच्या बाजूने बोलत गेलो, भांडत गेलो, ओबीसीच्या छोट्या छोट्या जात समूहांना जोडत गेलो. लाखो माणसं जोडली पण शत्रूची संख्या सुद्धा वाढत गेली, हल्ले झाले, झेलले, पण आत्ता सहन होत नाही. उद्या दैत्यानांदूर ता.पाथर्डी जि. अहिल्यानगरच्या ओबीसी मेळाव्यानंतर मी माझी भूमिका जाहीर करेन, असे लक्ष्मण हाकेंनी म्हटलं आहे.दरम्यान, मी आंदोलनात असेन किंवा नसेनही, तुम्ही जेवढी साथ दिलीत त्याबद्दल जाहीर जाहीर आभार मानतो, असे म्हणत लक्ष्मण हाकेंनी आंदोलनातून माघार घेण्याचे संकेत दिले आहेत. मात्र, यासंदर्भात आपण उद्या भूमिका जाहीर करणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. त्यामुळे, त्यांची भूमिका त्यांना मिळणाऱ्या धमक्यामुळे आहे की, ओबीसी नेत्यांकडून डावण्यात येत असल्याने, हेही उद्याच कळेल.

वंचितांचा शोषितांचा मेळावा म्हणून ओळख असलेल्या पंकजा मुंडे यांच्या दसरा मेळाव्याचा टिझर आता समोर आला आहे. संत भगवान बाबाची जन्मभूमी असलेल्या सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर हा मेळावा दरवर्षी होत असतो.यंदाचा दसरा मेळावा २ ऑक्टोबर रोजी असणार आहे. या दसरा मेळाव्यात पंकजा मुंडेंचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी मुंडे समर्थक भगवान भक्ती गडावर दाखल होत असतात. याच मेळाव्याच्या टिझर आता मंत्री पंकजा मुंडे यांनी त्यांच्या फेसबुक वर पोस्ट केला आहे.

## आरक्षण वाचविण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करतोय, पण...; छगन भुजबळांचं ओबीसींना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/राज्यातील मराठा-ओबीसी आरक्षणाचा लढा आणि संघर्ष अद्यापही सुरूच असून एकीकडे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा बांधव ओबीसीतून आरक्षणाच्या मागणीवर ठाम आहेत. तर, दुसरीकडे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये म्हणत ओबीसी नेतेही मैदानात उतरले आहेत. आरक्षणाच्या याच लढाईत दोन्ही समाजातील बांधव आपल्या आरक्षणाच्या काळजीपोटी टोकाचं पाऊल उचलत आहेत. नुकतेच बीडमध्येही एका युवकाने ओबीसी आरक्षण संपण्याच्या भीतीने जीवन संपवल्यानंतर ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी भावनिक पोस्ट करत ओबीसी बांधवांना आवाहन केलं आहे. ओबीसी बांधवांनो, आत्महत्येच्या वाटेला जाऊ नका... आरक्षण वाचविण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करतोय, असे छगन भुजबळ यांनी म्हटलंय.

परभणी जिल्ह्यातील आडगाव दराडे (ता. जिंतूर) येथील कुमार नारायण आघाव या ओबीसी तरुणाने मी ओबीसी आरक्षण संपण्याच्या भीतीपोटी आत्महत्या करीत आहे अशी चिठ्ठी लिहून ठेवत, तसेच बीड जिल्ह्यातील तागडगाव येथील कांचन आदिनाथ सानप या स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थिनीने देखील याच भीतीतून आपलं जीवन संपवलं. पाठोपाठ काल बीडचा रहिवासी असलेल्या राहुल पतंगे या तरुणाने देखील याच कारणातून आपला जीवनप्रवास थांबवला. आज बीड जिल्ह्यातील आत्माराम गणपत भांगे या रिक्षाचालकाने देखील याच मानसिक तणावातून आत्महत्या केली. या सर्व घटना अतिशय वेदनादायी आहेत. सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली! या सर्वांचे असे अकस्मात व अकाली निधन हा त्यांच्या कुटुंबांसाठी खूप मोठा आघात आहे.

त्यांच्या दुःखात आम्ही सर्वजण, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आणि सर्व ओबीसी संघटना सहभागी आहोत. एकामागोमाग होत असलेल्या या आत्महत्या म्हणजे ओबीसी समाजावर कोसळलेलं मोठं संकट आहे, असे म्हणत भुजबळ यांनी भावनिक साद घातली आहे.

## अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्यासह महावितरणला ‘एनर्जी लिडरशिप अवॉर्ड’

### नवी दिल्लीमध्ये राष्ट्रीय शिखर परिषदेत सन्मान

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/ सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाच्या विद्युत क्षेत्रामध्ये विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना वैयक्तिक गटात वर्ष २०२५ साठी ‘वूमन इन एनर्जी अवॉर्ड’ने तर कंपनी गटात महावितरणला ‘एनर्जी कंपनी (पॉवर) अवॉर्ड’ने नवी दिल्ली येथील राष्ट्रीय एनर्जी लिडरशिप शिखर परिषदेत गुरुवारी (दि. २५) गौरविण्यात आले.मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री ना. मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी या सन्मानाबद्दल अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आणि सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.




केंद्रीय नवीन व नवीकरणीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक आणि सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान यांच्याहस्ते अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. इकॉनॉमिक टाइम्सच्या वतीने आयोजित दोन दिवसीय वार्षिक शिखर परिषद २०२५ मध्ये ऊर्जा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू, अक्षय ऊर्जा, खाण, पर्यावरण, वन आणि हवामान बदल आदी क्षेत्रातील सुमारे ५०० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींची उपस्थिती होती. या परिषदेत अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे महाराष्ट्रातील वीजक्षेत्राच्या सादरीकरणासह विशेष व्याख्यान झाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ऊर्जा परिवर्तनातून सर्व वीजग्राहकांसाठी फायदेशीर आमुलाग्र सुधारणांना वेग दिला आहे. त्यामुळे वीज दरात प्रथमच घट झाली असून येत्या पाच वर्षांत ते आणखी कमी होत जाणार आहे.

जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे.

या योजनेमुळे महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे.

## अतिवृष्टीमुळं बारा बलुतेदार संकटात-शरद पवार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/महाराष्ट्रात सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या आपत्तीमध्ये केवळ पिकांचेच नुकसान झाले नाहीतर जनावरेदेखील मोठ्या प्रमाणावर दगावली आहेत. या अभूतपूर्व संकटाची व्याप्ती खूप मोठी आहे. अतिवृष्टीने केवळ शेतकरी वर्ग बाधित झाला नसून त्याची मोठी झळ गावातील लहान मोठे व्यावसायिक, कारागीर आणि शेतमजुरांना देखील बसली आहे. एकंदरीत गावांमधील बारा बलुतेदार, मागासवर्गीय समुदायावर देखील हे अरिष्ट कोसळल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी व्यक्त केले.

गावपातळीवर इंधनाचा आणि अन्नाचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण झाला असून सार्वजनिक वितरण व्यवस्था गतिमान करण्याची आवश्यकता आहे. रोगराई पसरण्याची शक्यता असून त्यास आळा घालून आरोग्याच्या सुविधा देखील तातडीने उपलब्ध करणे गरजेचे आहे. विध्यार्थांच्या शिक्षणावर देखील विपरीत परिणाम झाला असून त्याकडे त्वरेने लक्ष द्यावे लागेल.

दरम्यान, पिडीतांना भेटण्यासाठी मंत्री व लोकप्रतिनिधींच्या दौऱ्यांची अतोनात गर्दी होत असल्यामुळे सरकारी यंत्रणांचे लक्ष, नुकसानीचे पंचनामे व आपत्ती निवारणाच्या कामांऐवजी राजशिष्टाचार पूर्ण करण्याकडे वळले आहे. त्यामुळे पंचनामे करण्यास विलंब होऊन मदतकार्य ठप्प होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

## अखिल भारतीय काँग्रेस सेवादलाचे राष्ट्रीय अध्यक्ष लालजी भाई देसाई यांच्याकडुन सेवादलाच्या कामाचा आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** अखिल भारतीय काँग्रेस सेवादलाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय लालजी भाई देसाई हे त्यांना शहरात आले असता सेवा दलाचा जालना जिल्ह्याचा कामाचा आढावा व सेवादलाची भुमिका विशद करत असताना आदरणीय लालजी भाई यांनी सेवादलाच्या प्रशिक्षण व नारे याबाबत विचारना केली.



असता बाबासाहेब सोनवणे यांनी आंधीमें तुफानमें सेवादल मैदान मे , पहले लडें थे गोरोसे , अब लडेगें चोरोसे , देश का झंडा तिरंगा , नहीं चलेगा दोरंगा , वो दंडे से तोडेगें हम झंडे से जोडेगें , देश का बल सेवादल आदि घोषणा दिली.

याबाबत राष्ट्रीय अध्यक्ष लालजी भाई देसाई व प्रदेश अध्यक्ष विलास बापु औताडे यांच्या सोबत सर्व सभागृहाने बाबासाहेब सोनवणे यांच कौतुक करून कामाची प्रशंशा केली.

व्यासपीठावर काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव सचिन नाईक , सेवादलाचे प्रदेश अध्यक्ष विलास बापु औताडे , आ. राजेश राठोड , प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख , कल्याणराव दळे , सेवादलाचे प्रदेश सचिव किसन जेठे , शहर जिल्हा अध्यक्ष शेख. इब्राहिम , अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष रफिक सर , कामगारचे जिल्हा अध्यक्ष शेख. शमशुद्दीन , अतीक खान , वसीम खान , सूरज यलगंठवार , सोशल मीडियाचे अध्यक्ष रघुवीर गुढे ,यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

## संक्षिप्त

### २७ ते ३० सप्टेंबर कालावधीत पाठ्यपुस्तक मंडळांची सर्व व्यवहार बंद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/ शनिवार दि.२७ सप्टेंबर, ते मंगळवार दि.३० सप्टेंबर, २०२५ या कालावधीत पुस्तके व कागदाची भांडार स्तरावर वार्षिक प्रत्यक्ष साठा मोजणी होणार असल्याने या कालावधीत मंडळाची विभागीय भांडारे गोरेगाव, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, नाशिक, कोल्हापूर, पनवेल व अमरावती येथील सर्व व्यवहार (आवक-जावक, विक्री इत्यादी) बंद राहतील. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाकडे नोंदणीकृत झालेल्या सर्व मुद्रक, बांधणीकार व पुस्तक विक्रेते तसेच शैक्षणिक संस्था आदी सर्व संबधितांनी याची नोंद घ्यावी व सहकार्य करावे, असे आवाहन पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्राचे भांडार व्यवस्थापक एस.एम.पवार यांनी केली आहे.

### म्हाडाची १ ऑक्टोबर रोजी सोडत

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत १४०८ सदनिका, भुखंड, गाळ्यांकरीता ३० जून, २०२५ रोजीच्या विविध वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आलेली होती. जाहिराती अन्वये ऑनलाईन पद्ध्तीने अद्यावत अशा नविन एकात्मिक लॉटरी प्रणाली अंतर्गत ७ हजार ८८१ अर्जांची ऑनलाईन संगणकीय नोंदणी झाली आहे.

उपरोक्त अर्जांची संगणकीय सोडत ०१ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. संगणकीय सोडतीचे उद्घाटन सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्याचे नियोजित असल्याचे छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे उपमुख्य अधिकारी जे.एस.नामेवार यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

### मराठवाडा साहित्य परिषदचा ८२ वा वर्धापनदिन जालन्यात आयोजित

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मराठवाडा साहित्य परिषदेचा ८२ वा वर्धापनदिन रविवार, २८ सप्टेंबर २०२५ रोजी जालना येथे आयोजित करण्यात आला आहे. हा समारंभ सकाळी १०:०० वाजता जे. ई. एस. महाविद्यालयाच्या सभागृहात सुरु होईल.वर्धापनदिन समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील राहतील, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी प्रा. इंद्रजीत भालेराव, परभणी यांना आमंत्रित करण्यात आले आहे. समारंभात जालन्यातील ज्येष्ठ कथा-कादंबरीकार श्रीमती रेखा बैजल यांचा सत्कार करण्यात येणार असून, प्राचार्य डॉ. रामलाल अग्रवाल आणि डॉ. गणेश अग्निहोत्री यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

समारंभानंतर दुपारी २:०० ते ४:३० वाजता जालना जिल्ह्यातील मान्यवर व नवोदित कवींचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. या कविसंमेलनाचे अध्यक्ष राम गायकवाड राहतील, तर सहभागींमध्ये कैलास भाले, रत्नमाला मोहिते, विठ्ठलराव काष्टे, ज्योती धर्माधिकारी, कल्याणी देशमुख, सत्यशीला तौर, सदाशिव कमळकर, शिवाजीराव कायंदे, प्रभाकर शेळके, बसवराज कोरे, रंगनाथ खेडेकर, श्रीकांत गायकवाड, कविता बोरगावकर, लक्ष्मीकांत दाभाडकर, रमाकांत कुलकर्णी, विद्या दिवटे, राजेंद्र देशमुख, दीपक राखुंडे, उद्धव अदुडे, सुचिता कुलकर्णी, अशोक पाठक, अजय देसाई, राजाराम जाधव, कृष्णा आर्दड, गणेश कंटुले, प्रदीप देशमुख, सुरेश कायटे यांचा समावेश आहे.मराठवाडा साहित्य परिषदेच्या जालना शाखेच्या वतीने रसिकांना वर्धापनदिन समारंभ व कविसंमेलनात उपस्थित राहून साहित्यिक परंपरेचा अनुभव घेण्याचे आवाहन अध्यक्ष, शाखा जालना - रवींद्र तौर, कार्यवाह, शाखा जालना - पंडितराव तडेगावकर, कार्यकारिणी सदस्य - संजीवनी तडेगावकर, सुभाष कोळकर, बाळासाहेब तनपुरे यांनी केले आहे.

## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी घेतला अतिवृष्टीतील नुकसानीचा आढावा



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/ विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी अतिवृष्टीतील नुकसानीचा आढावा घेतला. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीतील नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करा, असे निर्देशपापळकर यांनी यावेळी दिले.

विभागीय आयुक्त पापळकर यांनी अतिवृष्टीच्या अनुषंगाने आज विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांची दुरदृष्यप्रणालीद्वारे आढावा बैठक घेतली. बैठकीला विभागातील सर्व जिल्हाधिकारी, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर विभागात माहे जून २०२५ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी झालेली आहे. या अतिवृष्टीच्या अनुषंगाने पंचनामे करण्यात आलेल्या जून ते ऑगस्ट २०२५ या कालावधीतील नुकसानी बाबत शासनाकडुन मागणीनुसार निधी प्राप्त झाला असून सदर निधीचे डीबीटी प्रणालीद्वारे संबंधित बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यात येणार आहे.

शासनाकडून सदर निधी संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी बाधित शेतकऱ्यांनी ई केवायसी करणे आवश्यक आहे. संबंधित शेतकऱ्यांनी याद्या प्रसिद्ध होताच त्वरित ई-केवायसी करून घ्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्त पापळकर यांनी केले.

## कवीचा वैकल्पिक संसार स्वातंत्र्य, समता, बंधुता आधारित - कवी कुमार अंबुज




स्वातंत्र्य, समता - बंधुता आधारित कवीचा एक वेगळा वैकल्पिक संसार असतो. मात्र प्रत्यक्ष जीवनातील वास्तव व सुखापेक्षा दुखामुळे अधिक निर्मित त्याचे साहित्य हे अधिक प्रासंगिक व भावणारे असते. अशा कवीने देखील नेहमी विषमतेकडे लक्ष वेधत कुठ्याही सत्त्पेक्षा विरोधी बाकावर बसणे सभ्य व अभिरुचीपूर्ण समाजाच्या हिताचे असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ हिंदी कवी कुमार अंबुज यांनी येथे केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे दिला जाणारा १३ वा 'कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार -२०२४' कवी श्री. कुमार अंबुज यांना येथील कुसुमाग्रज स्मारकाच्या विशाखा सभागृहात प्रदान करण्यात आला. एक लाख रूपयांचा धनादेश, मानपत्र, मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र - कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, निवड समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत पाटील, कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे, वित्त अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे आदी उपस्थित होते.यावेळी बोलतांना कवी कुमार अंबुज पुढे म्हणाले की आपले लेखन इतर भाषांमध्ये वाचले जाते आणि आपापल्या पद्धतीने समजून घेत त्यास दाद दिली जाते याचे कुठल्याही लेखक - कवीला समाधान असते व पुढील लेखनासाठी ते समर्थन नेहमी बळ देत असते. कवी कुसुमाग्रज यांच्या नावाने त्यांच्याच भूमीत पुरस्कार मिळणे हे आपल्यासाठी गौरवास्पद असल्याचे देखील ते म्हणाले. याप्रसंगी कवी अंबुज यांनी 'खाना बनाती स्त्रिया' ही संवेदनशील व 'सब तुम्हें नही कर सकते प्यार' ही मार्मिक कविता सादर करत उपस्थितांची मने जिंकली. अध्यक्षस्थानावरून बोलतांना मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की 'जे खळांची व्यंकटी सांडो' असे मानवतावादी लिखाण करणारे संत ज्ञानेश्वर यांच्या शृंखलेतील लिखान आपणास कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्यात दिसून येते.

# पुरामुळे मराठवाड्यातील अनेक कुटुंब उध्वस्त

**कायम कोरड्या दुष्काळाच्या छायेत असलेल्या धाराशिव जिल्ह्यात पुरानं हाहाकार उडालाय. हातावर पोट असलेल्या शेकडो शेतक-यांची कुटुंब उद्धवस्त झालीयेत. नेसत्या कपड्यानिशी घराबाहेर पडलेल्या शेतकरी कुटुंबांना वर्षभर जगायचं कसं असा यक्षप्रश्न उभा राहिलाय. धाराशिव, पाण्याच्या एकेका थेंबाला आसुसलेला धाराशिव जिल्हा आज मात्र महापुरामध्ये वाहून गेला आहे. अख्खी शेती, माती, घरं सगळं काही पाण्याखाली गेलंय. जगण्याच्या आधार असलेली जी जमीन होती ती वाहून गेलीये, डोक्यावरचं छप्पर कोसळलंय, आणि हात रिकामे आहेत. डोळ्यासमोर आहे फक्त शून्य.**

**सगळ्यांसमोर प्रश्न एकच, आता जगायचं कसं? हे आहेत मधुकर अडसूळ. कळंब तालुक्यातील ईटकुर गावचे अल्पभूधारक शेतकरी. केवळ चार एकर शेती पत्नी, मुलगा आणि मुलगी असं छोटं कुटुंब. शेतात काबाडकष्ट करून त्यांनी संसार उभा केला होता. पण या महापुरानं त्यांचं अख्खं आयुष्य उद्धस्त करून टाकलं. महापुरानं सगळं हिरावून नेलंय. आज त्यांच्या हातात काहीच शिल्लक नाही.**

**मधुकर अडसूळ यांच्या पत्नी मात्र या संकटानं पूर्णपणे कोसळून गेलीय. फक्त शेतीच नाही, तर पावसाच्या रौद्ररुपानं गोठ्यात बांधलेली एक गाय आणि शेळ्याही वाहून गेल्यात. घर उद्धस्त झालंय, संसार कोसळलाय आता उद्याची सकाळ कशी उगवेल हेच कळेना. मुलं बाळ उघडी पडतील. जगायचं कसं, हा यक्षप्रश्न त्यांना आहे. ओळखीपाळखीचे दिसले की त्या धायमोकलून रडतात, आक्रोश करतात.**

**अडसूळ कुटुंबाला आता दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. घरात धान्याचा एक दाणा नाही. आज ते फक्त गावकऱ्यांच्या भरोशावर जगतायत. गावकरी रोजच्या रोज थोडं अन्न आणून देतात, आणि त्यावरच या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरु आहे.उध्वस्त झालेलं हे कुटुंब एकमेव नाही. मराठवाड्यातल्या गावागावात आणि घराघरात थोड्या मोठ्या फरकानं हीच परिस्थिती आहे. महापुरात हातात काही राहिलेलं नाही, डोळ्यात काळजाला घर करणा-या वेदना आहेत. सरकार व काही संस्था मदतीचे प्रयत्न करतायत. पण यातून आयुष्य उभं राहणं कठीण. अशी हजारो कुटुंबं आहेत जी पुन्हा उभी राहण्यासाठी सरकारच्या ठोस धोरणाची वाट पाहतायत. केवळ तात्पुरती मदत पुरेशी नाही, तर कायमस्वरूपी पुनर्वसन आणि जगण्याची हमीच त्यांना वाचवू शकते.**

# 'गुगल' गुरु चा वाढदिवस!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे.

अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली.

जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## लामणगाव जिप शाळेत सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीचे धनादेश वाटप

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद/प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील लामणगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत २०२४-२५ शैक्षणिक वर्षातील सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.या शिष्यवृत्ती अंतर्गत इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी १००० रुपये, इयत्ता ५ ते ७ साठी १५०० रुपये आणि इयत्ता ८ वी साठी २००० रुपये अशा एकूण ४२ विद्यार्थ्यांना मिळून ५५,५०० रुपयांचे धनादेश वाटप करण्यात आले.



कार्यक्रमाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर पाटील मालोदे, उपसरपंच अशोक पाटील मालोदे, तसेच उपाध्यक्षा सोनिया गायकवाड मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ज्ञानेश्वर मालोदे, लक्ष्मण कोल्हे, विठ्ठल मालोदे, सुरेश मालोदे, विलास गायकवाड, भारत गायकवाड, शिवाजी गायकवाड, दीपक गायकवाड, मुख्याध्यापक बी. डी. जाधव, तसेच शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

## अतिवृष्टीच्या पंचनाम्यात दुजाभाव कराल तर याद राखा-खा.बजरंग सोनवणे यांचा इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**
**बीड / प्रतिनिधी/** मराठवाड्यात अतिवृष्टीने थैमान घातले आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. त्यांना शक्य तितकी मदत करणे गरजेचे आहे. असे असताना काही अधिकारी पंचनाम्यात दुजाभाव करण्याचे पातक करत असल्याचे दिसत आहे. अधिकाऱ्यांनी ओल्या दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांसोबत माणूसकीने वागावे, दुजाभाव कराल तर याद राखा, असा इशारा खा.बजरंग सोनवणे यांनी दिला आहे.

राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते जयंत पाटील हे दि.२६, शुक्रवारी रोजी बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीतील नुकसान पाहणी दौऱ्यावर आले होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी सकाळी पाटोदा शहरात भेटी देवून तेथील पुरपरिस्थतीने झालेल्या नुकसानची पाहणी केली. यानंतर ते कारेगाव येथे नुकसानीच्या पाहणीसाठी पोहचले. याठिकाणी जेष्ठ नेते जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, पाटोदा तालुकाध्यक्ष आनंद जाधव, माजी आमदार संगीता ठोंबरे, सुशीला मोराळे, राजेसाहेब देशमुख, यांची उपस्थिती होती. यानंतर त्यांनी डोंगरकिन्ही येथे भेट दिली. तर आष्टी तालुक्यातील धामनगाव, कडा, चोभानिमगाव, शिराळ या गावात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी अण्णासाहेब चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष सतीश शिंदे, राम खाडे, आष्टी तालुका अध्यक्ष सुनील नाथ, अमोल तरटे, शेख रिझवान, संजय थोरवे, अशोक पोकळे, जगनाथ ढोबळे, राहुल काकडे यांच्यासह तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टी झाली आहे. लोक एकमेकांना मदतीचा हात देवून माणूसकी दाखवत आहे. अशा परिस्थतीत माणूसकी दाखविणे आवश्यक आहे. असे असताना काही अधिकारी, कर्मचारी पंचनाम्यात दुजाभाव करत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. असे असेल तर ही पध्दत चुकीची आहे. पंचनामे योग्य पध्दतीने झाले नाही अथवा दुजाभाव केला तर सामान्य शेतकरी मदतीपासून वंचित राहू शकतात. अशावेळी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दुजाभाव न करता पंचनामे करावेत. जर पंचनाम्यात दुजाभाव केला अशी तक्रार आली तर याद राखा, दुजाभाव करण्याचे पातक करू नका, असा सल्लाही खा.बजरंग सोनवणे यांनी दिला. दरम्यान, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून पंचनामे



करण्यात वेळ वाया घालविण्यापेक्षा सरसकट मदत द्यावी, जिथे शेतात माती राहिली नाही, पिके सडलेली दिसत आहेत, तिथे पंचनामे कशाचे करायचे, इतके तरी सत्तधारी मंडळींनी लक्षात घेणे आवश्यक आहे, असेही खा.सोनवणे म्हणाले.

## ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तातडीने मदत करा.ॲड राजेश भैय्या शिंदे

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज/ प्रतिनिधी/** केज तालुक्यातील होळ व बनसारोळा महसूल मंडळामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकर्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे यामुळे शेतकरी उद्धस्त झाला आहे.

यामुळे शासनाने तात्काळ दखल घेऊन ओला दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपये मदत तसेच संपूर्ण पीकविमा लागु करण्यात यावा अशी मागणी मा. तहसीलदार साहेब,केज यांच्याकडे केली तसेच मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा




दिला तरी साहेबांनी यावर लवकरात लवकर शक्य ती मदत शेतकर्यांना करण्यात येईल असे आश्वासन दिले. यावेळी युवानेते मा. संग्राम (भैय्या) शिंदे, ड. राजेश शिंदे, सुनील (बापू) देशमुख यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर बांधकाम विभाग

### ई- निविदा प्रथम सूचना प्रसारण

दिनांक २७/ ९ / २०२५ पासून लेखाशिर्ष ३४५२-१९५८-३१- प्रादेशिक पर्यटन विकास योजना अंतर्गत एकूण १ कामाची ई निवीदा प्रसारीत करण्यात येत आहे. सदर कामांचे प्रथम प्रसारण २५ दिवस असून इतक्या कालावधीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. सर्व निवीदा अटी व शर्ती www.mahatenders goin यासंकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तरी जिल्हा परीषद बांधकाम नोंदणीकृत सर्व निवीदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत /-**
**कार्यकारी अभियंता (बांधकाम)**
**जिल्हा परीषद छत्रपती संभाजीनगर**

**स्वाक्षरीत /-**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परीषद छत्रपती संभाजीनगर**

**स्वाक्षरीत /-**
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परीषद छत्रपती संभाजीनगर**

**स्वाक्षरीत /-**
**कार्यकारी अभियंता (बांधकाम)**
**जिल्हा परीषद छत्रपती संभाजीनगर**

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, ई-निविदा सुचना

**जा.क्र. / मनपा/ई- निविदा / २०२५ / २८१**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**
**दिनांक: २६.०९.२०२५**

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा भरण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अ.श. ३.३ केव्ही एच.टी मोटर क्र. ०४ ची रिवाईडींग करणे. | ०१.१०.२०२५ |
| २. | झोन क्रमांक-४ अंतर्गत मयुरनगर/ सुदर्शनगर, श्रीकृष्णनगर एन-९/एच, पवननगर येथील जलवाहिनी चोकअप काढणे, दुषीत पाणी बंद करणे, दुरुस्ती करणे. | ०१.१०.२०२५ |
| ३. | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र १०२, कबीरनगर अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०१.१०.२०२५ |
| ४. | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र १०४, बन्सीलालनगर अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०१.१०.२०२५ |
| ५. | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र ७० पदमपुरा अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०१.१०.२०२५ |
| ६. | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र ७३, रमानगर अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०१.१०.२०२५ |
| ७. | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र १००, ज्योतीनगर अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०३.१०.२०२५ |
| ८. | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र १०३, वेदांतनगर अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०३.१०.२०२५ |
| ९. | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र ७२, क्रांतीचौक अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०३.१०.२०२५ |
| १० | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र १०९, देवानगरी प्रतापनगर अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०३.१०.२०२५ |
| ११ | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र ७१, क्रांतीनगर-उस्मानपुरा अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०३.१०.२०२५ |
| १२ | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रातील वार्ड क्र १०१, एकनाथनगर अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज लाईनचे चोकअप काढणे व दुरुस्ती करणे. | ०३.१०.२०२५ |
| १३ | प्राणीसंग्रहालयासाठी खाद्य खरेदी करणे. | ०३.१०.२०२५ |
| १४ | वार्ड क्र. ४६ नवाबपुरा अंतर्गत विविध ठिकाणी डांबरी गतीरोधक बनविणे. | ०३.१०.२०२५ |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांचे वतीने योग्यत्या वर्गातील ठेकेदारांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची विस्तृत माहिती संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
**सिस्टीम मॅनेजर (ई- निविदा)**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

# युवक- युवतींचे भवितव्य घडविण्यासाठी कटीबद्ध- कौशल्य,रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** कौशल्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी आयटीआय मध्ये आलेले सगळे विद्यार्थी विद्यार्थिनी हे आमच्या कुटुंबातील सदस्य आहेत. त्या आपुलकीनेच युवक युवतींचे भवितव्य घडविण्यासाठी शासन कटीबद्ध आहे,असे प्रतिपादन राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज येथे केले.देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे आज श्री. लोढा यांच्या उपस्थितीत एकात्म मानवतावाद याविषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. प्रेम खडकीकर यांनी 'एकात्म मानवतावाद' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास सहसंचालक पुरुषोत्तम देवतळे, संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आशिष गर्दे, सदस्य अर्जून गायकवाड, उपसंचालक प्रदीप दुर्गे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अभिजीत आल्टे, तसेच जग्वार फाऊंडेशनचे प्रसाद कंकाळ, सेंट ग्लोबेन्चे वैष्णव धार्मिक, टीएनएसच्या श्रीमती रुपा बोहरा, टोयोटा किर्लोस्करचे बी.एल.सुधाकर आदी उपस्थित होते.

यावेळी तसेच जग्वार फाऊंडेशन, सेंट ग्लोबेन, टीएनएस, टोयोटा किर्लोस्कर यांनी शासकीय आयटीआय मध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणीबाबत केलेल्या सामंजस्य कराराचे विमोचन करण्यात आले. तसेच ईलेक्ट्रिक व्हेईकल दुरुस्तीच्या लघु कालावधी अभ्यासक्रमाचे उद्घाटन श्री. लोढा यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच अल्पमुदत पशिक्षण कार्यक्रमअंतर्गत बांधकाम कार्यशाळेचे उद्घाटनही करण्यात आले.विद्यार्थ्यांनी यावेळी सोलर रिपेअरिंग, स्किन केअर, ड्रेस मेंकिंग, ए आय, रोबोटिक्स, मोबाईल रिपेअरिंग इ. विविध अभ्यासक्रम हवेत असे मंत्री महोदयांसमोर सांगितले. यातील निम्मे अभ्यासक्रम लगेचच सुरु करण्यात येतील,असे आश्वासनही श्री. लोढा यांनी दिले. श्री. लोढा म्हणाले की, आयटीआय मध्ये विद्यार्थ्यांना



हवे ते प्रशिक्षण सुरु करू. विद्यार्थ्यांना जे आवडतात, नवे क्षेत्र आव्हानात्मक वाटतात त्या क्षेत्राचे ज्ञान त्यांना व्हावे यासाठी अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील. त्यासाठी समाजातील त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घ्या. अशा मुलांना प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मुख्यमंत्री स्वयंरोजगार योजनेअंतर्गत कर्ज देऊन स्वतःचा व्यवसाय उद्योग उभारुन देऊ. आमच्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे अशा होतकरु युवक युवतींच्या पाठीशी शासन उभे राहील. कुटुंबातील मुलांप्रमाणे त्यांचे भवितव्य घडवू असेही लोढा यांनी सांगितले.

## शासकीय कर्मचाऱ्यांचा माहितीकोष; माहिती पाठविण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या कार्यालयाकडून महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील र्व कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष दरवर्षी अद्यायावत कार्यवाही करण्यात येत असून या वर्षी देखील माहितीकोष अद्ययावत करण्यासाठी कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.माहितीकोषामध्ये नियमित आस्थापनेवरील कर्मचारी व नियमितेतर आस्थापनेवरील कर्मचारी (कार्यव्यवी आस्थपनेवरील, रोजंदारीवरील, अंशकालीन, मानसेवी इ.) तसेच तदर्थ तत्वावर नेमणुका करण्यात आलेले कर्मचारी अशा सर्व प्रकाराच्या कर्मचाऱ्यांची माहिती दि.१ जुलै २०२५ या संदर्भ दिनांकास अनुसरुन गोळा करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाकडून दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वकष माहितीकोष - २०२५ बाबत शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. जिल्हा स्तरावर संबंधित जिल्हा सांख्यिकी कार्यालय शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष तयार करण्याची कार्यवाही करणार आहे.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून शासकीय कर्मचारी सर्वकष माहितीकोष - २०२५ नोंदणी करण्यासाठी ऑनलाईन संगणकीय आज्ञावली, फ्लोचार्ट, शासन परिपत्रक इ. शासनाच्या https://mahades.maharashtra.gov.in/CGE या संकेतस्थळावर एचऊल - २०२५ या नावाने उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. माहिती नोंदणी करताना कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती नोंदणी करण्याची दक्षता आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावयाची आहे.जिल्ह्याती सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी ऑनलाईन संगणकीय आज्ञावलीमध्ये माहिती नोंदणी दि.२ सप्टेंबर ते २ डिसेंबर पर्यंत पूर्ण करावयाची आहे. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कडून दिले जाणारे माहिती नोंदणी केल्याचे प्रथम प्रमाणपत्र माहे नोव्हेंबर, २०२५ (November 2025 to be paid in December 2025) च्या वेतन देयकासोबत व माहिती बरोबर असल्याचे दुसरे प्रमाणपत्र माहे फेब्रुवारी २०२६ (Februray, 2026 to be paid in March 2026) च्या वेतन देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. सूचना संचातील मुद्दा क्र.६ नुसार EM-DB-2025 पेक्षा सेवार्थ प्रणालीमधील मंजूर पदांमध्ये तफावत आढळत असल्यात त्याबाबत त्यांच्या वरिष्ठ प्राधिकारी अधिकाऱ्यास मूळ विभागास (Parent Department) आणि लेखा व कोषागारे संचालनालयास (DAT) प्रस्ताव सादर करावा व त्याची एक प्रत जिल्हा सांख्यिकी कार्यालयास सादर करावी.

अन्यथा सदर वेतन देयके कोषागार कार्यालय, अधिदान व लेख कार्यालयांकडून पारीत केले जाणार नाहीत.शासन परिपत्रकाच्या वेळापत्रका प्रमाणे सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी कार्यवाही करुन शासकीय कर्मचारी माहितीकोष तयार करण्यास सहकार्य करवे. असे आवाहन जिल्हा सांख्यिकी कार्यालय उपसंचालक यांनी केले आहे.

## नादरपुर जि.प्र शाळेतील मुख्याध्यापक अशोक सांडू गाडेकर यांचा सेवानिवृत्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील नादरपुर येथील जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापक अशोक गाडेकर यांचा सेवापूर्ती सोहळा जिल्हा परिषद शाळा नादरपुर मधील मुख्याध्यापक अशोक गाडेकर यांचा सेवानिवृत्तीचा गौरव सोहळा शुक्रवार रोजी २६ सप्टेंबर मोठ्या उत्साहात पार पडला. १२ सप्टेंबर रोजी ते नियमीत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत ३७ वर्षे त्यांनी विज्ञान व गणित या प्रामाणिकपणे अध्यापन कार्य केले. अध्यक्षस्थानी सरपंच सविताबाई दिलीप निकम मनीष दिवेकर साहेब गटशिक्षणाधिकारी पं स कन्नड डि टी शिंदे केंद्र प्रमुख के नाचनवेल दिलीप निकम प्रशासकीय अधिकारी छं संभाजीनगर सचिन शिदे गटशिक्षण सोयगाव सुर्यभान दवंगे माजी शिक्षण वि अधिकारी सुभाष निकम शिव सेना नेते अनेक मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रम प्रसंगी धुळे नाशिक छ संभाजीनगर हुन मित्रमंडळी समाज बांधव उपस्थित होते. पदाधिकारी यांनी गाडेकर सरांच्या कार्याचे कौतुक केले व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच अशोक सांडू गाडेकर सरांना शाल श्रीफळ . पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले . शिक्षक, विद्यार्थी व प्रमुख पाहुणे यांनी भावनिक भाषणं केली.व शेवटी सर्व प्रमुख पाहुणे विद्यार्थी गावातील प्रतिष्ठित मंडळी यांनी सुरुची भोजनाचा आनंद घेतला कार्यक्रमाचे प्रस्ताविक नरेंद्र पाटील सरांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील जाधव सर यांनी केले.आभार प्रदर्शन रामहारी निकम व दादाजी जगताप सर या वेळी नरेंद्र पाटील जगन्नाथ कोंडके सर सुनिल जाधव सर रामहरी निकम सर स्मिता वाकळे ज्योती गवांदे के के जंगले पोपट जंगले संतोष घोडके सर व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्य ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष पोलीस पाटील गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# काँग्रेसचा फुलंब्री तहसील कार्यालयासमोर आंदोलन,तालुक्यात ओला दुष्काळ घोषित करा

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/ प्रतिनिधी/सरफराज पटेल/** फुलंब्री तालुक्यात कुठे अतिवृष्टी तर कुठे ढगफुटी झाल्याने पिकांसह शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सरकारने ओला दुष्काळ जाहीर करावा, प्रशासनाने तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, सरसकट कर्जमाफी द्यावी आदी मागण्यांसाठी काँग्रेस तालुका कमिटीच्यावतीने फुलंब्री तहसील कार्यालयासमोर बुधवारी (दि.२४) अर्धा तास ठिय्या मांडत तहसीलदार योगीता खटावकर यांना निवेदन दिले.

फुलंब्री तालुक्यात मागील काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक संकट कोसळले आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता तालुक्यात सरसगट करून घ्यावेत, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची याप्रसंगी जिल्हा बँकचे संचालक जगन्नाथ काळे, तालुकाध्यक्ष संतोष मेटे, जिल्हा दूध संघाचे संचालक संदीप बोरसे, सोशल मिडीया तालुकाध्यक्ष बाबुराव डकले, ज्ञानेश्वर जाधव, गणेश काळे, इद्रीस पटेल, फैय्याज शहा, देविदास ढंगारे, मुदस्सर पटेल, प्रशांत नागरे, रज्जाक शेख, आजीनाथ सोनवणे, सदाशिव विटेकर, सुरेश मुळे, रेखा वहाटुळे, दिक्षा पवार, गणेश पवार, मुकेश चव्हाण, पंढरीनाथ जाधव, अंबादास गायके, आजीनाथ जोगदंडे, आकाश गायकवाड, भाऊसाहेब क्षीरसागर, कारभारी वहाटुळे,सोमीनाथ मते, विठ्ठल कोलते यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

सर्व मंडळात ओला दुष्काळ जाहीर करावा.या



अतिवृष्टीत फक्त शेतकरीच नव्हे तर फुलंब्री शहर तसेच फुलंब्री - खुलताबाद रस्त्यावरील फुलंब्री टी पॉइंटवरील दुकानात पाणी शिरून व्यापारी बंधूंना आर्थिक फटका बसला आहे.महसूल विभागाकडून नुकसानीचे तात्काळ पंचनामे मदत करावी अशी मागणी निवेदनातून आंदोलकांनी केली. फुलंब्री तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर केला नाही तर खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या नेतृत्वाखाली फुलंब्री तालुक्यात मोठे जनआंदोलन करण्यात येईल असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला.

## कुंभमेळ्यात नियोजना अंतर्गत वेरुळ येथे बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ प्रतिनिधी/** खुलताबाद - नाशिक येथे होणारया कुंभ मेळ्या दरम्यान खुलताबाद, वेरुळला भेट देणारया भाविकांची, पर्यटकांची संख्या पाहता, या बाबत आगामी ऐतिहासिक,पर्यटन दृष्ट्या महत्व पाहता,नाशिक येथे कुंभमेळ्यात येणारे भाविक या ठिकाणी भेट देणार असून, या अंतर्गत भाविकांना योग्य सुविधा मिळाव्यात या बाबत या बैठकी आढावा घेण्यात आला. ग्रामीण रुग्णालय येथे बेडची क्षमता वाढविणे, विविध ठिकाणी आरोग्य पथके ठेवणे, अति दक्षता विभाग बनविणे आदींचे नियोजन केले जाणार आहे.या नियोजन बैठकीला तहसीलदार स्वरुप कंकाळ,गट विकास अधिकारी



नियोजन करण्यासाठी शुक्रवारी वेरुळ येथील घृष्णेश्वर मंदिराच्या प्रांगणात उपविभागिय अधिकारी संतोष गोरड यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

या बाबत अधिक माहिती अशी खुलताबाद,वेरुळ या ठिकाणचे धार्मिक, तालुक्यात आगामी काळात वाहनतळांच नियोजन करण्यात करणे,रस्ते डायव्हर्जन, वेरुळ, खुलताबाद परिसरातील पर्यटन, धार्मिक, ऐतिहासिक स्थळांवर सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणे, कचरा व्यवस्थापन, हेलीपॅडची व्यवस्था, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रकाश नाईक,पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, देवस्थानाचे अध्यक्ष कुणाल दांडगे, राजेंद्र कोशिकै, योगेश टोपरे मिलिंद शिवाळे, संजय वैद्य यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, घृष्णेश्वर मंदिर विश्वस्त समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## चितेगाव मध्ये मास विक्री करणाऱ्या वर कार्यवाही

**आत्ताच एक्सप्रेस**

**बिडकीन/ प्रतिनिधी/** पैठण तालुक्यातील बिडकीन क्षेत्रातील चितेगाव येथे मास विक्री करणाऱ्या वर बिडकीन पोलिसाकडून कारवाई करण्यात आली.सविस्तर माहिती अशी की दी २४ बुधवार रोजी बिडकीन पोलिसांना मिळालेल्या माहिती नुसार चितेगाव येथील सादत नगर मस्जिद समोरील एका दुकानात गोवंश जातेच्या बैलाचे मास विक्री करत असताना शाहरुख अय्युब कुरेशी २५ वर्षे रा नूतन कॉलनी बडा तकीया शिल्लेखाणा संभाजीनगर,येथून आणून मास विक्री करण्याचा व्यवसाय करतो अशी माहिती बिडकीन पोलिसांना मिळाली त्या आधारे त्यांनी जाऊन पाहणी केली असता त्या ठिकाणी ४० किलो गोवंश जातींचे बैलाच्या मासाचे तुकडे त्यांना आढळून आले.त्याची किंमत अंदाजे ८००० हजार रुपये असून, रोख रक्कम ७२६० रु व कोयता, सुरा, वजन काटा असा एकूण मुद्देमाल १५२६० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून महाराष्ट्र पशु संवर्धन कायद्या नुसार कारवाई करण्यात आली आहे. सदर ची कारवायी बिडकीन ए पी आय निलेश शेळकेच्या मार्गदर्शनाखाली पी एस आय मनोज एकनाथ पाटील व हें कॉ अप्पासाहेब माळी ने केली आहे पुढील तपास अप्पासाहेब माळी करत आहे.

## संक्षिप्त

### ऑरिक सिटी वर्धापन दिनानिमित्त सोमवारी समृद्धी जोडमार्गाचे लोकर्पण

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**ऑरिक सिटीच्या ६ व्या वर्धापन दिनानिमित्त वर्धापन दिन समारंभ व समृद्धी जोडमार्गाचे लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दि.२९ रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे , उद्योग विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू यांची या सोहळ्यास उपस्थिती राहणार आहे. उपस्थितीचे आवाहन महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप चे व्यवस्थापकीय संचालक पी.डी. मलिकनेर, सह व्यवस्थापकीय संचालक दत्ता भडकवाड यांनी केले आहे. लोकार्पण सोहळा समृद्धी महामार्गालगत तर मुख्य सोहळा ऑरिक हॉल, ऑरिक सिटी शेंद्रा, छत्रपती संभाजीनगर येथे सोमवार दि.२९ रोजी सकाळी ११ वा. होणार आहे.

### उद्योगमंत्री उदय सामंत यांची अतिवृष्टी नुकसानग्रस्त भागाची पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेले राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज सकाळी अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली. आ. विलास भुमरे, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड हे याप्रसंगी उपस्थित होते. अंबिकापूर ता. छत्रपती संभाजीनगर येथील मोसंबी व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या शेताची त्यांनी पाहणी केली. अतिवृष्टीमुळे मोसंबी सारखे फळपिक आणि ऊस पिकाच्या झालेल्या नुकसानीची पाहणी त्यांनी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना दिलासा दिला. शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन उभे आहे,असे त्यांनी सांगितले. तसेच यंत्रणेला त्वरीत पंचनाम्यांचे काम पूर्ण करावे असे निर्देशही दिले. त्यानंतर श्री. सामंत हे जालना जिल्ह्यातील भागाची पाहणी करण्यासाठी रवाना झाले.

### 'म्हाडा'सदनिका १ ऑक्टोंबर सोडत

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत १४०८ सदनिका, भूखंड गाळ्याकरीता दि.३० जून रोजीच्या विविध वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. जाहिराती अन्वये ऑनलाईन पद्धतीने अद्यावत अशा नवीन एकात्मिक लॉटरी प्रणाली अंतर्गत ७८८१ अर्जांची ऑनलाईन संगणकीय नोंदणी झाली आहे. अर्जाची संगणकीय सोडत बुधवार दि.१ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ वा.जिल्हा नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. या संगणकीय सोडतीचे उद्घाटन सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते होणार आहे.

### बांधकाम कामगारांना 'गृहउपयोगी वस्तू संच' निःशुल्क वाटप

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप करण्यात येते. सर्व कामकाज हे ृ.ारहरलेलु.ळप या संकेतस्थळावरुन ऑनलाईन प्रणालीद्वारे निःशुल्क करण्यात येते.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून नोंदीत जिवीत, सक्रिय कामगारांना मे.मफतलाल इंडस्ट्रीज लि. मुंबई या संस्थेच्या वितरण केंद्रावर गृहपयोगी संचाचे वाटप करण्यात येते. संच कुटुंबातील (पती / पत्नी) करीता एकच अनुज्ञेय राहणार आहे. गृहपयोगी संचाचे वाटप निश्चित दिनांक भेट पद्धत Appoinment System नुसार होणार असून मंडळाच्या http://hitkit.mahabocw.in/appointment या संकेतस्थळाला भेट देऊन लाभार्थ्यांनी अपाईटमेंट घेऊन संच मिळवण्यासाठी संच वाटपाचा दिनांक व वितरण केंद्र याची निवड करावी. कामगाराने त्याने निवडलेल्या दिनांकास मंडाळाचे ओळखपत्र अथवा आधार कार्ड व नियुक्ती पत्र घेऊन निवडलेल्या वितरण केंद्रावर उपस्थित राहिल्यानंतर ऑनलाईन प्रणाली प्रक्रियेनंतर कामगारांना प्रत्यक्ष संच ताब्यात देण्यात येईल. हे वाटप पूर्णत: निशुल्क असून कोणत्याही एजंट, संघटना अथवा त्रयस्थ व्यक्ती यांच अमिषाला व दबावाला बळी पडू नये व त्यांचेशी कोणतेही आर्थिक व्यवहार करु नये. कोणत्याही व्यक्ती कडून नोंदणी, नुतनीकरण व लााभासाइी पैशाची मागणी केल्यास त्यांचे विरोधात जवळचे पोलीस स्टेशन व या कार्यालयास तक्रार दाखल करावी असे आवाहन सहायक कामगार आयुक्त ग.भा.बोरसे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती;कार्यालय नवीन जागेत स्थलांतरीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर कार्यालय नवीन जागेवर स्थलांतरीत करण्यात आले आहे. नवीन जागेचा पत्ता प्रमोदकुमार गणोरकर यांची इमारत प्लॉट नं ८३५, एन - ५ पाण्याच्या टाकीसमोर चिशतीया चौक, सिडको, छत्रपती संभाजीनगर पिन नं. ४३१००३ येथे स्थलांतरीत करण्यात आलेले आहे, असे सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती श्रीमती प्रिती बांद्रे - केळकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस




## आधार ग्रुपच्या वतीने आपत्तीग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** काही दिवसापासून जालना शहर व परिसरात होत.असलेल्या अतिवृष्टीने जालना शहरातील झोपडपट्टी भागातील नागरिकांसह अनेक शाळकरी विद्यार्थ्यांचेही पाठ्यपुस्तके व शालेय साहित्य खराब झाल्याने मोठे शैक्षणिक नुकसान झाले आहे.आधार ग्रुपचे अध्यक्ष अश्विन अंबेकर यांनी ही बाब लक्षात घेत आज शुक्रवार रोजी आधार ग्रुपचे सदस्य कुणाल देशमुख, अभिमन्यू काठोठीवाले, संदीप मगर, आकाश बारगजे, चेतन गुप्ता, गौरव इंगळे, गणेश डोके यांना सोबत घेऊन जालना शहरातील साठे नगर व परिसरातील गोरगरीबांच्या या वस्तीत वह्या व पेन या शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. आधार ग्रुप हा नेहमीच वेगवेगळ्या अडचणीच्या प्रसंगी सामान्य व अडचणीत असलेल्या नागरिकांना मदत करत असतो.यापूर्वीही आधार ग्रुपच्या वतीने अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना अन्नधान्याच्या किट वाटून आपत्तीग्रस्तांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला. आधार ग्रुपच्या वतीने विद्यार्थ्यांना करण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याच्या मदतीबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी / अंगद मुंढे/** जायकवाडी प्रकल्पातुन सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे गोदाकाठावरील शेतकऱ्यांचे शेतीसह पिकांचे अतोनात नुकसान झाले असल्याने परतूर तालुक्यातील गोळेगाव येथील शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईची मागणी उपविभागीय अधिकारी यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की,दिनांक २१,२२,व २३ सप्टेंबर रोजी गोदावरी पात्रातुन मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्याने सर्वत्र पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन यामुळे गोदा काठावरील अनेक शेतकऱ्यांची जमिनी सह पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे,याबाबत उपविभागीय अधिकारी परतूर यांना गोळेगाव येथील शेतकऱ्यांनी लेखी निवेदन दिले असून पुरात गेलेल्या शेतीचे पंचनामे करून हेक्टरी एक लक्ष पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी,शेतकऱ्यांना कर्जमाफी करून सातबारा




कोरा करावा,पुरात वाहून गेलेल्या वस्तूची भरपाई मिळावी,सतत तीन दिवस शेतात पाणी राहिल्याने जमीन खचून गेली त्याचा मोबदला मिळावा व लोणी सावंगी बंधाऱ्याच्या पाण्यामुळे बाधित होत असलेल्या जमिनीचा देखील मोबदला देण्यात यावा अशी मागणी सदरील निवेदनाद्वयारे केली असून त्यावर शिवाजीराव डोळस,तुकाराम काटे,सिद्धार्थ डोळस,ज्ञानेश्वर धुमाळ,तुकाराम डुकरे,मोहण इंगोले,सखाराम शेटे,सहदेव वाघमारे,मधुकर कांबळे,महादेव जाधव,ज्ञानेश्वर इंगोले,कृष्णा चांदर,गंगाधर इंगोले,युनूस शेख,दिगंबर मोहटे,भगवान शेळके,सुखदेव शेळके,भारत गुंजकर,ज्ञानेश्वर ढवळे,रामराव गुंजकर,लक्ष्मण गुंजकर,कल्याण तौर ,लक्ष्मण घोरड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मॅजिक आयटीआय जालना इन्क्यूबेशन सेंटरच्या माध्यमातून जिल्ह्यातील युवकांना उद्योजक होण्याची संधी

**- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा**
**- ई 'मॅजिक आयटीआय जालना इनक्युबेशन सेंटर' चे उद्घाटन**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यातील युवकांच्या उद्योग विषयक कल्पनेनुसार आप-ला स्वतंत्र उद्योग सुरु करुन उद्योजक होण्यासाठी मॅजिक इन्क्यूबेशन सेंटरच्या माध्यमातून सुवर्णसंधी निर्माण झाली असल्याचे राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.येथील हुतात्मा जनार्दनमामा नागापुरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परिसरात सुरु करण्यात आलेल्या मॅजिक इन्क्युबेशन सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी श्री. लोढा हे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार, कौशल्य विकास विभागाच्या विभागीय उपआयुक्त विद्या शितोळे, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे सहसंचालक पुरूषोत्तम देव-तळे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अतुल केसकर आणि शासकीय आयटीआयचे प्राचार्य प्रविणकुमार उखळीकर, मॅजिक संचालक मंडळाचे आशिष गर्दे, रितेश मिश्रा, नितीन काबरा, सुनील रायठ्ठा, प्रसाद कोकिळ, केदार देशपांडे, प्रशांत देशपांडे, मिलिंद कांक, सुरेश तोडकर तसेच मॅजिकची यंग टीमचे यशराज पिट्टी आणि अनुज बन्सल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी लोढा पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्षात उतरवून मॅजिक इन्क्युबेशन सेंटरच्या सहकार्याने कौशल्याधारित उद्योग सुरू करून आयडीया ते इन्कम टॅक्स धारकहा प्रवास साध्य करावा. आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना उद्योगामध्ये रूपांतरित करून त्या माध्यमातून स्वतःचे उत्पन्न वाढविणे व रोजग-ार निर्मिती करणे एवढ्यावरच न थांबता. त्यांनी आपले उत्पन्न वाढवून आयकरधारक होण्याची संधी या इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. आई-वडिलांच्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी युवक-युवतींनी नवकल्पना मांडून यशस्वी उद्योजक व व्यवसायिक बनावे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास उप-स्थित उमेदवारांशी संवाद साधून, आयटीआयमध्ये कोणते अभ्यासक्रम अपेक्षित आहेत याबाबत त्यांनी प्रत्यक्ष विचारणा केली. यावेळी उमेदवारांनी सुचविलेल्या ड्रोन ऑपरेटर, सोलार टेक्नीशियन, इलेक्ट्रिक व्हेइकल टेक्नीशियन, ब्युटी थेरपिस्ट आदी अभ्यासक्रम दि. ०८ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत हमखास रोजगार देणारे प्रशिक्षण म्हणून सुरू करण्याचे निर्देश व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागास त्यांनी यावेळी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल




म्हणाल्या की, जिल्ह्यातील युवकांना मॅजिक सेंटरच्या माध्यमातून आपला स्वत:चा स्टार्टअप सुरु करण्याची संधी निर्माण झाली आहे. अशी संधी देणारा हा राज्यातील पहिला प्रकल्प आहे. या मॅजिक सेंटरमुळे भविष्यात खुप चांगले परिणाम आपणांस पाहण्यास मिळणार आहे. उद्योग उभारण्यासाठी ला-गणारे डिझाईन आणि भांडवल यासाठीचे मार्गदर्शन व मदन या सेंटरद्वारे उपलब्ध झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत-जास्त नवसंकल्पनाधारकांनी मॅजिक इन्क्युबेशन सेंटरमध्ये आपली नोंदणी करून, यशस्वी उद्योजक बनावे. तसेच ग्रामीण भागातील नवसंकल्पनाधारक युवक-युवतींसाठी तालुकास्तरावर मॅजिकप्रमाणे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कौशल्य विकास विभागाचे कौशल्य विकास अधिकारी भुजंग रिठे, आत्माराम दळवी, डॉ. अमोल परिहार, अमोल बोरकर, प्रदीप डोळे, दिपक पालवे, अमर तुपे तसेच मॅजिकचे अधिकारी राघवेंद्र कुलकर्णी, शशीकांत तिवारी, प्रिती कामठे, कृष्णा टेकाळे, आयेशा मन्सुरी, मिरा चितांमणी, गौरव पटेल यांनी सहकार्य घेतले.यावेळी कार्यक्रमास येथील जिल्ह्यातील उद्योजक, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी-कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्योजक घनश्यामदास गोयल यांच्या हस्ते स्त्री दुर्गा जागर मंडळाची आरती

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना शहरातील सामाजिक कार्यकर्त्या नंदा पवार यांच्या स्त्री दुर्गा जागर मंडळाची गुरूवारी उद्योजक घनश्यामदास गोयल यांच्या हस्ते आरती करण्यात आली.शिवनगर येथील चांभारकुंड परिसरात नंदा पवार यांनी स्थापलेले या मंडळाचे आयोजन भक्तिभावाने पार पडले. या वेळी गोयल यांनी देवी यल्लमा समोर अतिवृष्टीमुळे शेतमालाचे नुकसान झाले आहे, शेतकरी संकटात आहेत, यापुढे शेतकऱ्यांवरील संकट टळो व त्यांना बरकत मिळो, जनतेचे आरोग्य निरोगी राहो असे साकडे घातले.



यावेळी ढोर समाजाचे जेष्ठ नेते मुरलीधर चांदोडे यांनी गोयल यांचा सत्कार केला. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या नंदा ताई पवार, गणेश चांदोडे, सुरज यलगंठवार, सचिन क्षिरसागर, गजानन ठोंबरे, कुलदीप चांदोडे, समाधान खाडे, राजकुमार पोळ, गणेश बागडे, सचिन जेवाळ, लक्ष्मण भोरे, आकाश चांदोडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते.कार्यक्रम भक्तिभावाने पार पडला आणि उपस्थितांनी देवीस सामूहिक प्रार्थना करून शेतकऱ्यांसाठी कल्याणाची इच्छा व्यक्त केली.

# विप्र फाउंडेशन शाखेच्यावतीने दोन दिवसीय दांडिया महोत्सव

**आचार्य सत्यनारायण व्यास, प.पू. मनोज महाराज गौड, भक्तमाल कथा प्रवक्ता किशोर तिवारी यांचे आशीर्वचन**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** विप्र फाउंडेशन शाखा जालनाच्यावतीने २७ व २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता रुक्मिणी गार्डन येथे दोन दिवसीय दांडिया महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात अधिक माहिती देताना विप्र फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली यांनी सांगितले की, या महोत्सवामध्ये विप्र समाजातील बांधव, भगिनी तसेच नागरिक सहकुटुंब सहभागी होणार आहे. पारंपरिक पोशाख, दांडियाच्या तालावर सजणारे नृत्य, आकर्षक प्रकाशयोजना, रंगीबेरंगी सजावट आणि सांस्कृतिक विविधतेचा संगम या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.



आशीर्वचन देण्यासाठी आचार्य सत्यनारायण महाराज व्यास, प.पू. मनोज महाराज गौड, भक्तमाल कथा प्रवक्ता किशोर तिवारी यांची विशेष उप-स्थिती लाभणार आहे.

आपली संस्कृती, परंपरा आणि ऐक्याचे प्रतीक असलेल्या दांडिया महोत्सवाचा विप्र समाजातील बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन विप्र फाउंडेशनचे अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली, सचिव पंडित विजय व्यास, संस्थापक अध्यक्ष रामनिवास गौड, जिल्हा समन्वयक पवन जो-शी, विप्र युवा अध्यक्ष परीक्षित शर्मा, सचिव संतोष खंडेलवाल, रोहित गौड, वरून शर्मा,हितेश जोशी,गौरव बोरा, विप्र महिला अध्यक्ष सौ. जया शर्मा, सचिव सौ. मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष अरुणा पारिक, बहुमंडल अध्यक्ष सौ. प्रियंका दायमा, सचिव सौ. आदिती गौड, कोषाध्यक्ष सौ. सपना सारस्वत, महोत्सवाचे प्रायोजक यजमान बंकटलाल खंडेलवाल, उमेश पंचारिया, श्रीमती ताराबाई उपाध्याय, मनोज जोशी, डुंगरसिंह राजपुरोहीत, अक्षय भारजवाल परिवार, शिवप्रसाद श्रीमाली, नवीनकुमार शर्मा, सूर्यप्रकाश ओझा, संतोष तिव-ारी, सतीश शर्मा, सिद्धांत शर्मा, अशोक शर्मा, कपिल शर्मा, राजेंद्र शर्मा, अक्षत श्रीमाली, रणवीर मिश्रा, पवन गौड, राजेंद्र सारस्वत, महेश सारस्वत, शैलेश शर्मा,विजय शर्मा, सुशील गौड, संजय सारस्वत, सुनील शर्मा, विशाल शर्मा, जुगलकिशोर श्रोत्रीय, राहुल उपाध्याय, राजेश उपाध्याय, राहुल ओझा, दिलीप गौड, रितेश मिश्रा, राकेश पारिक, अमोल दायमा, संदिप दायमा, नारायण दायमा, भगवान दायमा, सुरेश शर्मा यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### जालना तालूक्यातील रोहनवाडी आणि पानशेंद्रा भागात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानग्रस्त भागाची उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केली पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीने झाल्याने जिल्ह्यातील अनेक भागातील शेतपिकांचे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर आज राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री श्री. उदय सामंत यांनी आज जालना तालूक्यातील रोहनवाडी आणि पानशेंद्रा या गावात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतपिकाची पाहणी केली.

यावेळी सामंत यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधुन, या नैसर्गिक संकटाच्या वेळी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असुन, बाधीत शेतकऱ्यांना शासन सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे व त्यांना न्याय मिळवून देण्याची आमची जबाबदारी आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. कृषिमंत्र्यांनी सगळ्या उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांना सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले आ-हेत. त्यानुसार पंचनामे करुन, शासनामार्फत नुकसानग्रस्त भागा-तील शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत पोहोचविण्यात येणार असल्याचेही श्री. सामंत यांनी यावेळी सांगितले.यावेळी आमदार अर्जुन खोतकर, उपविभागीय अधिकारी श्री. दौड, तहसिलदार श्रीमती छाया पवार, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह रोहनवाडी आणि पानशेंद्रा या गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतकऱ्यांच्या समस्या व अडचणी जाणून घेतल्या.

### मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी अतिवृष्टीने झालेल्या नुकसानग्रस्त शेतपिकांची केली पाहणी



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीने झाल्याने जिल्ह्यातील अनेक भागातील शेतपिकांचे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज बदनापूर तालूक्यातील शेलगाव या गावात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतपिकाची पाहणी केली. यावेळी लोढा म्हणाले की, शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने झालेल्या नुकसानीनुसार योग्य पंचनामे करावे. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनामार्फत मदत देण्यात येणार आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असुन, त्यांनी काळजी करू नये. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून बाधीत शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहचविण्यात येणार असल्याचेही लोढा यांनी यावेळी सांगितले.यावेळी आमदार नारायण कुचे, उपविभागीय अधिकारी दौड, तहसिलदार, हेमंत तायडे, सरपंच, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह शेलगाव येथील गावकऱ्यांची उपस्थिती होती.

### २८ सप्टेंबर रोजी लोक अदालतीचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** तहसिल घनसावंगी यांच्या न्यायालयात प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक प्रकरणांच्या तातडीने निपटारा व्हावा तसेच नागरीकांना जलद न्याय मिळावा या उद्देशाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ महसुल सेवा पंधरवडा अंतर्गत न्याय आपल्या दारी या संकल्पनेतुन रविवार २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय घनसावंगी येथे लोक अदालत आयोजित केली आहे.

लोक अदालतमध्ये तडजोड होऊ शकणाऱ्या महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार मामलदार कोर्ट क्ट ( १५ च्या कलम १४३, कुळकायदा दावे अंतर्गत अर्धन्यायीक प्रकरणांमध्ये समेट/तडजोड करायची असल्यास विहीत नमुन्यामध्ये अर्ज करण्यासाठी सर्व संबंधीत नागरीक शासकीय कार्यालये यांना याद्वारे सुचित करावे. तरी सर्व नागरिकांना विनंती आहे की, अर्धन्यायीक प्रकरणांमध्ये तातडीने न्याय मिळवून घेण्यासाठी या लोकअदालतीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपात्रांसह वेळेवर उपस्थित राहावे. अशी माहिती तहसिलदार घनसावंगी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात पंडीत दिनलयाळ उपाध्याय यांना अभिवादन



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हाधिकारी कार्यालयात आज पंडीत दिनदयाळ उपयाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी पंडीत दिनदयाळ उपयाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, नायब तहसिलदार तुषार निकम, सतीष तायडे, दिपाली राऊत, सहायक महसूल अधिकारी सविता पेरके, अतुल केदार, विठ्ठल बोरकर, मीनाक्षी देवशी, अर्जुन चौधरी, सविता भोकरे, वैशाली दिघुळे आदींची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247

The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813